महाराष्ट्र शासन

# प्रकल्प अधिकारी,एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प
# कार्यालय नंदुरबार याहा मोगी चौक नवापूर रोड नंदुरबार

दूरध्वनी क्र.-02564-210303, Email :- poitdp.ndb-mh@gov.in

जाक्र भांडार- भोठेजा-2019/ प्र.क्र 01/ का6(1)/ /2019 दिनांक 28जानेवारी,2019

## भोजन ठेका निविदा पूर्व बैठकीत झालेला निर्णया बाबत इतिवृत्त सन-2019-20

प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, नंदुरबार अंतर्गत कार्यरत 22 आदिवासी मुलां/ मुलींचे शासकीय वसतिगृहांतील विद्यार्थी / विद्यार्थ्यांना सन 2019-20 या वर्षात ठेका पध्दतीने भोजन पुरवठा करण्याकरीता दिनांक 23 जानेवारी 2019 रोजी ई- निविदा सुचना प्रसिध्द करण्यात आली आहे. सदर ई- निविदेच्या वेळापत्रकानुसार दिनांक 28 जानेवारी 2019 रोजी निविदापूर्व बैठकीत उपस्थित निविदाकार यांनी निविदेतील पान क्रमांक 5 तांत्रिक लिफाफ्या मधील आवश्यक कागदपत्रे बाबत खालील प्रमाणे मुद्यावर चर्चा करण्यात आलेली आहे.

1. मुद्या क्रमांक :- 6 मधील बॅक पतवारी प्रमाणपत्र दिनांक 1.5.20 पर्यंत वैध असावी असे नमुद केले आहे त्या बाबत सदरची मुदत रद्द करण्यात येत असून कोणत्याही राष्ट्रीयकृत बॅकेची() पतवारी प्रमाणपत्र निविदेतील नमुद केलेल्या रक्कमेनुसार सादर करणे आवश्यक आहे
2. मुद्या क्रमांक :- 8 निविदाकार यांची दिनांक 1 एप्रिल2015 ते 31 मार्च 2018 पर्यतची तीन वर्षाची उलाढाल 75 क्षमता वसतिगृहासाठी रुपये 25.00 लाखापेक्षा अधिक, 250 क्षमता वसतिगृहासाठी रुपये 70.00 लाखापेक्षा अधिक, 500 क्षमता वसतिगृहासाठी रुपये 150 लाखापेक्षा अधिक असल्या बाबतचे सनदी लेखापालाचे प्रमाणपत्र निविदेसोबत सादर करणेची अटी वर चर्चा करण्यात आली त्यात चर्चेअंति निविदेतील नमुद वसतिगृहांसाठी आवश्यक असलेल्या खर्चाचा तपशिल नुसारच खर्च होणार असल्याने उलाढालीच्या रक्कम बदल करण्यात आलेले नाही.
3. निविदेतील सर्व साधारण अट क्रमांक 35 मधील एका निविदाधारकांस कमीत कमी दोन निविदा भरता येतील तसेच त्याच निविदाकारास जास्तीत जास्त दोन भोजन पुरवठा कामे मंजूर करण्यात येतील. या बाबत ज्या निविदाकार यांनी तीस-या वसतिगृहांसाठी निविदा भरली असल्यास अनक्रमांकानुसार तिसरी निविदा रद्द समजण्यात येईल.
4. खरेदी समिती मार्फत भोजन पुरवठया कामी सन 2019-20 करीता निश्चित होणारे दर मान्य असल्या बाबत संमतीपत्र ही अट निविदाकारास जाचक अट असल्या बाबत निविदाकार यांनी मुद्या उपस्थित केला होता. तथापी खरेदी समितीने सदरची अट ही योग्य आहे कारण एखदया निविदाकार यांनी वाजवी दरापेक्षा जास्त दर नमुद केल्यास सदर संमतीपत्र अभावी वाटाघाटा करता येऊ शकते या बाबत सुचना केलेल्या आहेत.

सर्व निविदाकारांना सदर बैठकीत केलेल्या सुचना नुसार खरेदी समितीने आज दिनांक 28 जानेवारी, 2019 रोजी घेतलेल्या निर्णयानुसार कोणत्याही निविदाकार यांना अटी शर्तीत शिथिलता देण्यात येणार नाही. सर्व निविदाकार यांनी निविदेत मागणी केलेल्या कागदपत्रानुसार निविदा भरणे आवश्यक राहील. तसेच काही अत्यंत अपवादात्मक बाबीसंदर्भात खरेदी समिती शिथिलतेबाबत निर्णय घेऊ शकेल.

वरील प्रमाणे बदलाची निविदेतील भाग घेणा-या सर्व निविदाकारांनी नोंद घ्यावी.

वान्मती सी ( भा.प्र.से.)
प्रकल्प अधिकारी
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प
नंदुरबार

Scanned by CamScanner

महाराष्ट्र शासन

# प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प

नंदुरबार याहा मोगी चौक नवापूर रोड नंदुरबार

दूरध्वनी क्रमांक - 02564-210303,

Email Address :- poitdp.ndb-mh@gov.in

सन 2019-20 या शैक्षणिक वर्षात कार्यालयाच्या अंतर्गत असलेल्या आदिवासी मुलांचे / मुलींचे शासकीय वसतिगृह, एकलव्य रेसि. पब्लीक स्कुल नंदुरबार व शासकीय इंग्रजी माध्यम आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना ठेका पध्दतीने भोजन पुरवठा सदर निविदेतील वेळापत्रकास मुदत वाढ देण्यात येत आहे.

- निविदे प्रक्रियेचा कार्यक्रम खालील प्रमाणे राहील.

| अ.क्र | कार्यालयीन प्रकिया | निविदाधारकांची प्रक्रिया | सुरु दिनांक व वेळ | अंतिम दिनाक व वेळ |
|---|---|---|---|---|
| 1. | निविदा प्रसिध्द | - | 23/01/2019 वेळ 10.30 | 23/01/2019 वेळ 12.30 |
| 2 | - | ऑन लाईन निविदा विक्री व भरणे (Download) | 23/01/2018 वेळ 12.45 | 11/02/2019 वेळ 12.59 |
| 3 | - | ऑन लाईन निविदा भरणे.(तांत्रिक लिफाफा व दरपत्रक लिफाफा) | 23/01/2019 वेळ 12.50 | 12/02/2019 वेळ 15.59 |
| 4 | ऑन लाईन तांत्रिक लिफाफा बंद करणे | - | 12/02/2019 वेळ 16.00 | 12/02/2019 वेळ 18.00 |
| 5 | ऑन लाईन दरपत्रक लिफाफा बंद करणे | - | 12/02/2019 वेळ 16.00 | 12/02/2019 वेळ 18.30 |
| 6 | - | ऑन लाईन निविदा सादर करणे | 12/02/2019 वेळ 18.31 | 14/02/2019 वेळ 10.15 |
| 7 | ऑन लाईन तांत्रिक लिफाफा उघडणे | - | 14/02/2019 वेळ 10.30 | 18/02/2019 वेळ 18.00 |
| 8 | ऑन लाईन दरपत्रक लिफाफा उघडणे | - | 14/02/2019 वेळ 10.30 | 18/02/2019 वेळ 18.00 |

टिप :- इच्छूक निविदाकार यांनी निविदा सादर करण्या संदर्भात बदलानुसार कार्यवाही करणे आवश्यक राहिल.

पी.बी. देसाई(स.प्र.अ.)
प्रकल्प अधिकारी
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प
नंदुरबार करिता

Scanned by CamScanner